**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०७ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. **आगामी जनगणनेची प्रक्रिया पुढच्या वर्षीच्या एप्रिलपासून सुरू होणार.**
2. **राज्यात शिधापत्रिकेवर मिळणाऱ्या तांदळाच्या खरेदी आणि वितरणात भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करून अधिवेशन संपण्यापूर्वी अहवाल सादर करण्याचे विधानसभा अध्यक्षांचे निर्देश.**
3. **ब्रिक्स परिषदेत पहलगाम हल्ल्याचा निषेध/ दहशतवादाशी मुकाबला करण्याचा सदस्य देशांचा निर्धार.**
4. **नागपुरात आज पावसाची संततधार, ९ तारखेपर्यंत पूर्व विदर्भात मुसळधार पावसाचा इशारा.**

---

**जनगणनेची प्रक्रिया**

**आगामी जनगणनेची प्रक्रिया पुढच्या वर्षीच्या एप्रिलपासून सुरू होणार असल्याचं, नोंदणी महासंचालक आणि जनगणना आयुक्त कार्यालयानं, आज समाज माध्यमांवर जाहीर केलं. सुरुवातीला घरांची नोंदणी आणि मोजणी, दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्येची गणना, ज्यात जातनिहाय जनगणनेचा समावेश असेल असं त्यांनी कळवलं आहे. यासाठी एक जानेवारी २०२६ ते ३१ मार्च २०२७ दरम्यान, प्रशासकीय सीमारेषांमध्ये कुठलेही बदल करू नये असं आवाहन, जनगणना आयुक्तांनी सर्व राज्यं आणि केंद्र शासित प्रदेशांना केलं आहे.**

---

**त्रिभाषा सुत्र**

**त्रिभाषा सुत्राची अंमलबजावणी करण्यासाठी, सरकारनं स्थापन केलेल्या, अर्थतज्ञ, नरेंद्र जाधव यांच्या समितीला, विविध स्तरातून विरोध होतो आहे. यासाठी आज मुंबईत, आझाद मैदानावर, सकाळपासून आंदोलन सुरू आहे. विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. पाचवी पर्यंत तिसरी भाषा नको, नरेंद्र जाधव समिती रद्द करा, शिक्षणमंत्री दादाजी भुसे आणि, S.C.E.R.T.चे**

संचालक, राहुल रेखावार यांना, पदावरून दूर करा इत्यादि आंदोलकांच्या मागण्या आहेत.

-----------------------------------

**विकास योजनांबाबत बैठक**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन इथं नागपूर जिल्हा महावितरण आणि महापारेषण आढावा तसंच कोराडी, खापरखेडा प्रकल्पां संदर्भात, पर्यावरण विभागाच्या निर्देशांची, अंमलबजावणी आणि विकास योजनांबाबत बैठक घेण्यात आली.

-----------------------------------

**सहकारी संघ**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या, २०२५-३०, या पंचवार्षिक निवडणुकीसाठी, सहकार पॅनेलनं आपले उमेदवार घोषित केले आहेत. आमदार प्रविण दरेकर, राज्य सहकारी संघाचे नेते, संजय कुसाळकर आणि शिवाजीराव नलावडे या पॅनलचं नेतृत्व करत आहेत. मतदान होण्यापूर्वीच या पॅनेलचे, प्रविण दरेकर, गुलाबराव मगर आणि प्रकाश दरेकर हे उमेदवार, बिनविरोध निवडून आले आहेत. शिक्षण-प्रशिक्षण देणाऱ्या संघात, समन्वयानं काम करण्याच्या, मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार, कुसाळकर आणि दरेकर ही निवडणूक एकत्र लढवत आहेत.

-----------------------------------

**बेसा -पिपला**

नागपुरातील बेसा पिपळा भागात एजंट जमिनीच्या प्लॉटचे आर.एल. करून देण्याचं आमिष दाखवून फसवणूक करत आहे असे प्रकार उघडकीस येत आहे. याबाबत भारत नंदनवार मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रशासक नगर पंचायत बेसा यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे.....

*(होल्ड बाइट - भारत नंदनवार 26 सेकंद)*

*नगरपंचायत बेसा-पिपळामध्ये जे गाव समाविष्ट आहेत. बेसा पिपळा, बेलतरोडी आणि घोगली या गावातील आरएल करण्याचे काम नगर पंचायतने सुरू केले आहे. परंतु नगर पंचायतच्या असे लक्षात आलेले आहे की, आरएल करण्याच्या कामात एजंट लोकांचा फार सुळसुळाट झालेला आहे. ते लोकांची फसवणूक करतात. त्यामुळे आपल्याला इथल्या नागरिकांना अशी विनंती करतो की आपण कुठल्याही एजंटकडे आरएल करण्यासाठी जाऊ नये. नगर पंचायतशी संपर्क*

*साधावा. नगरपंचायत आपल्याला आपल्या प्लॉटचं आपल्या घराचा आरएल करून देईल.*

-------------------------------------

शिधापत्रिका

राज्यात रेशनसाठी पुरवण्यात येणाऱ्या, तांदळाच्या खरेदी आणि, वितरणात भ्रष्टाचार होत असल्याच्या आरोपाची चौकशी करून, अधिवेशन संपण्यापूर्वी तो अहवाल सादर करावा असे आदेश, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज दिले. काँग्रेसच्या नाना पटोले यांनी काही दिवसांपूर्वी हा आरोप केला होता. त्यावरच्या प्रश्ना दरम्यान अध्यक्षांनी हे आदेश दिलेत. नंदुरबार जिल्ह्यात अक्कलकुवा इथं सुरू असलेल्या तेल भेसळी प्रकरणी संबंधित कारखाना, तातडीनं बंद करून संबंधित अन्न आणि औषध प्रशासनासह, आयुक्त तसंच सहाय्यक आयुक्त यांना, निलंबित करण्याची घोषणा, या विभागाचे मंत्री, नरहरी झिरवाळ यांनी केली. याबाबतचा मूळ प्रश्न, आमश्या पाडवी यांनी उपस्थित केला होता. त्यावर समीर कुणावार यांनी उप-प्रश्न विचारले. संबंधित कंपनी वारंवार तेल भेसळ प्रकरणी दोषी आढळून आली आहे. सोयाबीन, शेंगदाणा तेल यांचे नव्यानं घेण्यात आलेले नमुने देखील, भेसळयुक्त आढळून आलेत. असं आढळल्यावर, ही कंपनी अधिकाऱ्यांनी तातडीनं बंद करण्याची कारवाई करणे, आवश्यक होते मात्र ते न केल्यानं, त्यांना निलंबित करण्याची घोषणा, झिरवाळ यांनी केली.

-------------------------------------

रोजगार प्रशिक्षण

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना, विद्यार्थी विकास, रोजगार प्रशिक्षण तसंच इंटर्नशिपच्या संधीबाबत एकाच क्लिकवर आता माहिती उपलब्ध होणार आहे. विद्यापीठाचे विद्यार्थी ॲप, आता गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थी हिताच्या विविध विद्यार्थी विकास योजना, इंटर्नशिप, प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी देखील या ॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. विद्यार्थी कल्याणच्या योजनांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध व्हावी या हेतूने प्रभारी कुलगुरू डॉ.माधवी खोडे-चवरे यांच्या संकल्पनेतून, विद्यार्थी विकास विभागाच्या माध्यमातून, मोबाईल ॲप तयार करण्यात आलं आहे. विद्यार्थी विकास विभाग आणि रोजगार आणि प्रशिक्षण विभागाच्या, विविध योजना, मोबाईल ॲपच्या माध्यमातून, विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविल्या जाणार आहेत.

------------------------------------

## ब्राझील

ब्राझीलमध्ये रिओ-द-जेनेरिओ इथं सुरु असलेल्या, ब्रिक्स शिखर परिषदेत, ब्रिक्स राष्ट्रांनी सर्व प्रकारच्या दहशतवादाचा सामना करण्यासाठी आपली वचन बद्धता दर्शवली. यावेळी सर्व राष्ट्रांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला. या परिषदेत शांतता आणि सुरक्षितता, यावरील सत्राच्या सुरवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवादाचा मुद्दा उपस्थित केला. दहशतवादाचा निषेध ही केवळ सोय नाही तर ती आपली मूल्यप्रणाली असली पाहिजे असं ते म्हणाले. महत्त्वाच्या खनिजांचा तसंच तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळीचा वापर कोणत्याही देशानं स्वार्थासाठी किंवा स-शस्त्रीकरणासाठी करु नये असं आवाहन, पंतप्रधान मोदी यांनी, या निमित्त आयोजित संवाद सत्रात केलं. तात्परुत्या स्वरुपाचे निर्णय घेण्याऐवजी दूरगामी परिणामाचा विचार करुन निर्णय घेणं गरजेचं आहे असं ते म्हणाले. ब्रिक्स परिषदेचं अध्यक्षपद पुढच्या वर्षी भारताकडे असणार आहे. या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा यंदाच्या परिषदेतला सहभाग आणि ब्राझिल दौरा महत्त्वाचा असल्याचं केंद्रीय आर्थिक व्यवहार विभागाचे सचिव, दामू रवी यांनी सांगितलं. जागतिक पातळीवर काम करणाऱ्या संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक इत्यादी संस्थांचे हात अधिक बळकट करण्याची गरज असल्याचा मुद्दा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाच्या परिषदेत जोरकसपणे मांडला असं रवी म्हणाले.

------------------------------------

## हवामान

भारतीय हवामान खात्यानं नागपूर जिल्ह्यामध्ये आजपासून ते येत्या नऊ जुलै २०२५ या कालावधीत मुसळधार ते अति मुसळधार पाऊस, मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवलेली आहे. ऑरेंज अलर्ट कालावधीमध्ये काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवलेली आहे. विदर्भातील अन्य जिल्हे, अमरावती, वर्धा, अकोला, बुलढाणा, वाशिम, यात उद्या वादळी पर्जन्यमान तर अमरावती आणि वाशिम जिल्ह्यात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. नागपूर, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, इथे उद्या देखील ऑरेंज अलर्ट कायम राहणार आहे. दरम्यान, विजगर्जना होत असताना शक्यतो घरातच राहणे, मोबाईल फोन सोबत न बाळगणे, घरातील इलेक्ट्रिकल उपकरणे बंद ठेवणे, झाडाच्या खाली उभे न राहणे या बाबी पाळण्याची गरज आहे.

नदी, नाले, दुथळी वाहत असतात तेव्हा पाणी पुलावरून किंवा रस्त्यावरून वाहत असते अशा वेळी चुकूनही तो पुल किंवा रस्ता चालत किंवा गाडी मधुन ओलांडण्याचा प्रयत्न करू नये. प्रशासनाकडून निर्गमित होत असलेल्या सुचनाचं पालन करून सहकार्य करावे. जिल्हयातील समस्त नागरिकांना आणि शेतकऱ्यांनी शासनाच्या सर्व सूचनांचं पालन करावे आणि स्व-संरक्षणासाठी सतर्क राहावे असं आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपूर यांनी केलं असून, आपत्ती आल्यास ०७१२-२५६२६६८ वर संपर्क करावा. महावितरणतर्फे देखील नागरिकांना योग्य ती खबरदारी घेण्याचं आवाहन करत आहे. भंडारा जिल्हयात कालपासून पावसाची रिपरिप सुरू होती. आज सकाळपासून मात्र संततधार पाऊस पडतोय यामुळे सर्वत्र पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहेत. भंडाऱ्याच्या वैनगंगा नदीवरील, भंडारा ते कारधा लहान पुल, तुमसर तालुक्यातील गोंदेखारी ते टेमनी, चुल्हाड ते सुकळी हे मार्ग बंद करण्यात आले आहेत.

-----------------------------------

सत्कार

सर्वोच्च न्यायायलायचे सरन्यायाधीश, न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांची, भारताच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती झाल्याबद्दल, त्यांचा महाराष्ट्र विधान मंडळातर्फे सत्कार करण्यात येणार आहे. हा सत्कार सोहळा उद्या दुपारी दोन वाजता, मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई इथं आयोजित करण्यात आला आहे. सत्कार सोहळयास व्यासपीठावर महाराष्ट्र विधानपरिषद सभापती, प्रा.राम शिंदे, महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष, ॲड.राहुल नार्वेकर, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार विधानपरिषद उप-सभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष, अण्णा बनसोडे, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते, अंबादास दानवे उपस्थित राहतील. सर्व मंत्रीगण तसंच दोन्ही सभागृहांचे सन्माननीय सदस्य, विधि आणि न्याय क्षेत्रातील मान्यवर यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या सत्कार सोहळ्याप्रसंगी, सरन्यायाधीश भूषण गवई यांचं "भारताची राज्यघटना" या विषयावर संबोधन होईल.

-----------------------------------

३३ प्रवासी जखमी

आषाढी वारी करून, पंढरपूरहून घराकडे परतणाऱ्या वारकऱ्यांच्या एसटी बसला, भीषण अपघात झाल्याची घटना, आज पहाटे दोन वाजताच्या सुमारास, बुलढाणा जिल्हयातील चिखली जवळ घडली. रस्त्याच्या दुभाजकाला आदळून झालेल्या

**बसच्या या अपघातात तीस वारकरी गंभीर जखमी झालेत. सुदैवानं या अपघातामध्ये जीवितहानी झाली नाही. मध्यरात्री दोनच्या सुमारास हा अपघात झाला. जखमी वारकऱ्यांना उपचारासाठी चिखली आणि बुलढाणाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.**

**------------------------------------**